

जगद्गुरू संत शिरोमणी
रविदासजी महाराज
यांच्या जयंती निमित्त
हार्दिक शुभेच्छा

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२९२ ■ बुधवार, दि. १२ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -292 ■ Wednesday, 12 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# पंचवीस लाख 'लखपती दीदी' करण्याचे उद्दिष्ट – मुख्यमंत्री

## राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात 'उमेद मॉल' उभारणार, पहिल्या टप्प्यामध्ये १० मॉल उभारणार

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

'महालक्ष्मी सरस' हा अत्यंत लोकप्रिय उपक्रम झाला आहे. राज्यभरातील बचत गटांना हक्काचे विक्रीचा साधन उपलब्ध व्हावे यासाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यात दहा मॉल तयार करणार. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात उमेद मॉल तयार करणार आहोत. त्याचं बरोबर राज्यात आगामी कालावधीत एक कोटी लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. सध्या राज्यात १८ लाख लखपती दीदी असून मार्चपर्यंत पंचवीस लाख लखपती दीदी करणार आहोत अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा, मुंबई येथे ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्यावतीने ११ ते २३ फेब्रुवारी दरम्यान सुरू राहणाऱ्या 'महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन – २०२५' चे उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, 'उमेद'चे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, उमेदचे मुख्य परिचलन अधिकारी परमेश्वर राऊत यांच्यासह राज्यभरातून बचत गटांच्या महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, 'महालक्ष्मी सरस' हा गेली २१ वर्ष अविरत सुरू असलेला उपक्रम आहे. 'उमेद' अभियानाच्या प्रगतीचा मी स्वतः साक्षीदार आहे. 'उमेदच्या' माध्यमातून 'महालक्ष्मी सरस' हा राज्यभरात महिला बचत गटांना एक हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा उपक्रम झाला आहे. महिला बचतगटांची उत्पादने खूप चांगली असतात. पण यांच्या विक्रीसाठी खूप उपाययोजना कराव्या लागतात. यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जिल्हा परिषदेच्या परिसरात उमेद अभियानाच्या माध्यमातून मॉल उभारणार. यासाठी आगामी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल. प्राथमिक स्तरावर दहा जिल्ह्यांत 'उमेद मॉल' उभारण्यात येतील, असे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, बचत गटांमार्फत तयार केलेली वस्तू ही खाजगी कंपनीच्या मालापेक्षा अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असून ती अत्यंत माफक दरात उपलब्ध होतात. 'उमेद'च्या माध्यमातून ६० लाखापेक्षा अधिक कुटुंब आर्थिक प्रगती करत आहेत. या माध्यमातून बचत गटातील महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'लखपती दीदी'ही योजना आणली आहे.ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त आहे त्यांना 'लखपती दीदी' म्हटले जाते. आज महाराष्ट्रात ११ लाख पेक्षा जास्त 'लखपती दीदी'आहेत. लवकरच २५ लाख महिलांना 'लखपती दीदी' करण्याचा शासनाचा मानस आहे. आगामी कालावधीत एक कोटी महिला लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. स्त्रीशक्ती ही आर्थिक विकासाला गती देणारी एक महाशक्ती होईल. बचत गटांच्या माध्यमातून ही चळवळ सुरू झाली आहे. शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी,लाडकी बहिण योजना, एस. टी. मध्ये प्रवास सवलत यासह अनेक महिला सक्षमीकरणाच्या योजना आणल्या आहेत.लाडका भाऊ म्हणून लाडक्या बहिणींच्या विकासासाठी सदैव पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

ग्राम विकासमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. बचत गटांच्या माध्यमातून होणाऱ्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळवून देणे यासाठी शासन आग्रही आहे. महिला बचत गटांच्या उत्पादित माल विक्रीचे हमखास ठिकाण मिळावे यासाठी जिल्ह्याच्या महत्वाच्या ठिकाणी मॉल उभारणार. तालुक्यात देखील विक्री केंद्र सुरू करण्यात येतील. बचत गटांसोबतच वैयक्तिक कर्ज देण्यासाठी निर्णय झाला पाहिजे. आज उमेद अभियानाच्या माध्यमातून लाखो महिला सक्षम उद्योजिका म्हणून अनेक उत्पादनांची निर्मिती करत आहेत. त्यांनी तयार केलेली ही विविध उत्पादने देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचून त्यांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून दरवर्षी ङ्गमहालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शनङ्ग आयोजित केले जाते या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन मंत्री श्री. गोरे यांनी सांगितले. ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, 'उमेद'च्या माध्यमातून गेली २१ वर्षे सरसच्या माध्यमातून महिलांना खुली बाजारपेठ उपलब्ध करून महिलांना प्रोत्साहन दिले जाते. महिला अर्थिक स्वावलंबी झाल्या पाहिजेत. यामध्ये ६० लाखापेक्षा अधिक लाख कुटुंबे जोडली गेली आहेत. अजूनही यामध्ये सुधारणा करायला वाव आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना प्रत्येक जिल्ह्यावर मार्केटिंग व्हावे यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. 'महिला सरस'ला राज्यभरातून मिळणारा प्रतिसाद अत्यंत उत्स्फूर्त आहे. एकूण ४७९ स्टॉल्स आहेत. २५ टक्के अन्य राज्यातील महिला बचत गट देखील 'सरस'मध्ये सहभागी आहेत. या प्रदर्शनातून मोठ्या प्रमाणात बचत गटांच्या उत्पादनांची विक्री होऊन ग्रामीण महिलांच्या कर्तृत्वाला व उद्योग व्यवसायाला प्रोत्साहन देण्याची संधी मुंबईकरांना मिळणार आहे. या प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन वैविध्य पूर्ण उत्पादने, ग्रामीण कला, संस्कृतीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

आभार ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी मानले.

# महाकुंभात आतापर्यंत ४५ कोटी भाविकांचे स्नान



प्रयागराज : उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे आयोजित महाकुंभमेळ्यांतर्गत आतापर्यंत सुमारे ४५ कोटी भाविकांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केले आहे. त्यामुळे हा इतिहासातील सर्वात मोठा धार्मिक सोहळा ठरला आहे.

हा कुंभ मेळा समाप्त होण्यासाठी अद्यापही १५ दिवस बाकी आहेत. अशात ४५ कोटी इतक्या विक्रमी संख्येने भाविकांचा ओघ असल्याने गर्दीच्या व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला आहे. यापुढचे अमृत स्नान १२ फेब्रुवारी २०२५ रोजी माघ पौर्णिमा स्नानाच्या दिवशी आहे. गुरु बृहस्पतींच्या पूजनाशी संबंध असल्याने आणि या दिवशी या संगमावर स्वर्गातून गंधर्व भूलोकी उतरतात अशी हिंदू पुराणातील धारणा असल्याने या दिवसाला विशेष महत्त्व आहे. माघ पौर्णिमा स्नानाच्या काळात गर्दीचे व्यवस्थापन सुविहित होण्याकरिता राज्य सरकारने मेळ्याच्या परिसरात ११ फेब्रुवारीच्या सकाळपासून वाहनबंदी क्षेत्र घोषित केले आहे आणि केवळ अत्यावश्यक आणि आकस्मिक सेवांच्या वाहनांनाच तिथे प्रवेश दिला जाईल.

महाकुंभ २०२५ ला जाणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी भारतीय रेल्वे आपल्या सेवा पूर्ण क्षमतेने चालवत आहे. ९ फेब्रुवारी रोजी सुमारे ३३० रेल्वे गाड्यांमधून १२.५ लाख भाविक दाखल झाले तर १० फेब्रुवारीला दुपारी ३ वाजेपर्यंत आणखी १३० गाड्या रवाना झाल्या. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या अमृत स्नानाच्या तयारीचा अधिकारी आणि केंद्रीय मंत्र्यांनी आढावा घेतला. प्रयागराज जंक्शनसह सर्व आठ रेल्वे स्थानकांचे परिचालन पूर्ण क्षमतेने केले जात आहे तर गर्दीच्या व्यवस्थापनासाठी स्नानाच्या प्रमुख तारखांच्या काळात प्रयागराज संगम स्थानक तात्पुरते बंद ठेवण्यात आले आहे.

विविध संस्थांच्या सहकार्याने राज्य सरकारने एक बहु-स्तरीय सुरक्षा आणि देखरेख प्रणाली तैनात केली आहे. एआय-आधारित सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे, ड्रोन टेहळणी आणि रियल टाईम ॲनालिटिक्सच्या वापरामुळे महत्त्वाच्या जागी भाविकांची सुरक्षित ये-जा सुनिश्चित झाली आहे.स्नान घाटांवर भाविकांना सहजतेने स्नान करता यावे यासाठी प्रशासनाने डिजिटल टोकन प्रणालीचा वापर सुरू केल्यामुळे, स्नानासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी टाळता आली आहे. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग भाविकांसाठी विशेष सुविधा करण्यात आल्या, ज्यामुळे हा कुंभ मेळा आध्यात्मिक अनुभूती देणारा एक सर्वसमावेशक सोहळा ठरला आहे.

# सामाजिक न्याय विभागाचा निधी इतरत्र ट्रान्स्फर केल्यास संबंधितावर गुन्हे दाखल करण्याचा कायदा केंद्राने करावा - खा. चंद्रकांत हंडोरे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्र सरकार २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याची घोषणा करत आहे, मात्र अजूनही देशात अट्रोसिटी केसेस कमी झाल्या नाहीत,२००५ साली तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी लोकसंख्येच्या प्रमाणात मागास प्रवर्ग निधी असावा अशी नियोजन मंडळाची स्थापना केली होती ज्यास निती आयोगाने २०१५ साली मान्यता दिली. यानुसार केंद्राचा २ लाख ३० करोड रुपयांची तरतूद करणे आवश्यक असताना या बजेटमध्ये मात्र ६२ हजार कोटी वित्त मंत्रालयाने दिले आहेत.



मागास जातींचा फंड इतर विभागाकडे पाठविण्यात येतो असे प्रकार बंद करण्यासाठी केंद्राने कर्नाटक व आंध्र प्रदेश सरकारने केलेला मागास निधी कॅरी फॉरवर्ड कायदा केंद्रात लागू करून असे प्रकार करणाऱ्या संबंधितांवर गुन्हे दाखल करून ३ वर्ष कारावासाची शिक्षा असणारा कायदा देशभरात लागू करावा अशी आगृही मागणी खा. चंद्रकांत हंडोरे यांनी आज राज्यसभेत बजेटवरील भाषणात केली.

अट्रोसिटी साठी केंद्राने २ लाख केसेस झालेल्या आहेत यासाठी ४७१ करोडची तुटपुंजी तरतूद केली आहे, यासाठी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. केंद्राने मागासवर्ग विकासासाठी एका वसतिगृहासाठी मात्र ४० कारोडची तरतूद केली आहे. केंद्र सरकारने प्रत्येक राज्यातील प्रत्येक तालुक्यात किमान एक वसतिगृह सुरू करावे, आपण महाराष्ट्र सरकारात सामाजिक न्याय मंत्री असताना राज्यात प्रत्येक तालुक्यात एक वसतिगृह सुरू केल्याची आठवण त्यांनी सभागृहाला करून दिली. वेंचर कॅपिटल फंड साठी किमान ५ हजार कोटी रुपयांची तरतूद व्हावी, परदेशी शिक्षण घेण्यासाठी दरवर्षी १ हजार विद्यार्थी केंद्राने पाठवावेत अशी मागणीही त्यांनी अभ्यासपूर्ण मांडली.

# ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांचे निधन; साहित्य विश्वात शोककळा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

ज्येष्ठ कथाकार आणि कादंबरीकार रावसाहेब रंगराव बोराडे उर्फ रा. रं. बोराडे यांचे आज वयाच्या ८४व्या वर्षी निधन झाले. ग्रामीण जीवनाचे विविध पैलू उलगडणाऱ्या त्यांच्या लेखनशैलीने मराठी साहित्यविश्वात वेगळा ठसा उमटवला होता.

रा. रं. बोराडे यांची लेखनशैली साधी-सोपी आणि वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी होती. त्यांच्या कथांचा शेवट हा नेहमी धक्कादायक असतो, जो वाचकांना अंतर्मुख करतो. त्यांच्या कथांमधून ग्रामीण भागातील वैशिष्ट्यपूर्ण पात्रे उभी राहत असत. 'पाचोळा' या त्यांच्या गाजलेल्या कादंबरीमुळे त्यांना 'पाचोळा'कार बोराडे म्हणूनही ओळखले जात होते.

बोराडे यांच्या लेखनातून मराठवाडी बोलीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# पोलीस-नक्षल चकमकीत सी ६० दलातील जवान शहीद,

**रायगड (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गडचिरोली : जिल्ह्यातील भामरागड आणि छत्तीसगड सीमेवर झालेल्या चकमकीत गडचिरोली पोलिसांच्या नक्षलविरोधी पथक सी ६० दलातील एक जवान शहीद झाला. आज, मंगळवारी दिरंगी-फुलणार जंगल परिसरात ही चकमक झाली. महेश नागुलवार (३९, रा. अनखोडा) असे शहीद जवानाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्तीसगड सीमेला लागून असलेल्या भामरागड तालुक्यातील दिरंगी आणि फुलणार या गावांतील जंगल परिसरात गेल्या काही दिवसांपासून नक्षलवाद्यांनी तळ ठोकला होता. ही माहिती प्राप्त होताच गडचिरोली पोलिसांचे नक्षलविरोधी सी ६० चे १८ पथक आणि सीआरपीएफच्या दोन पथकाच्या जवानांनी १० जानेवारीला या परिसरात नक्षलविरोधी मोहीम राबवली होती. आज या परिसराला जवानांनी घेराव घातला असता लपून बसलेल्या नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. चकमकीदरम्यान गडचिरोली सी ६० पथकाचा जवान महेश नागुलवार याला गोळी लागली. हेलिकॉप्टरने उपाचारासाठी नेण्यात येत असताना त्यांची प्राणज्योत मालवली.

चकमकीच्यावेळी २५ ते ३० नक्षलवादी तेथे उपास्थित असल्याची माहिती असून यात नक्षल नेता रघुसह काही मोठे कमांडर होते. चकमक परिसर घनदाट जंगलाने वेढलेला असल्याने जवानांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत नक्षलवाद्यांशी लढा दिला. गेल्या चार वर्षात गडचिरोली पोलिसांनी केलेल्या आक्रमक कारवायांमुळे नक्षलवादी चळवळ खिळखिळी झाली होती. चार वर्षात एकही जवान शहीद झालेला नव्हता.

'फुटबॉल फ्रीस्टाईलर्स' जेमी नाईट नागपुरात देतोय फुटबॉलचे धडे

दोन मुलींचे पितृछत्र हरवले

चामोर्शी तालुक्यातील अनखोडा गावातील रहिवासी असलेला शहीद जवान महेश नागुलवार २०१२ मध्ये पोलीस दलात भरती झाले होता. वर्षभरापूर्वी महेशने गडचिरोली शहरात घर बांधले होते. त्याची पत्नी राज्य परिवहन महामंडळात नोकरीला असून त्यांना दोन मुली आहेत. महेशच्या निधनामुळे मुलींचे पितृछत्र हरविले असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मागील काही वर्षांपासून छत्तीसगड आणि गडचिरोली पोलिसांनी केलेल्या आक्रमक कारवायांमुळे नक्षलवाद्यांची मोठी कोंडी झालेली आहे. दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्र सीमेवरील बिजापूर जिल्ह्यात झालेल्या चकमकीत छत्तीसगड पोलिसांनी ३१ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले होते. यात दोन जवानही शहीद झाले. त्यामुळे महाराष्ट्र सीमाभागात नक्षल्यांचा वावर वाढला आहे. डोंगराळ आणि घनदाट जंगलामुळे कोपर्शी, फुलणार भागात नक्षलवाद्यांच्या हालचाली वाढल्याने गडचिरोली पोलिसांनी ही मोहीम हाती घेतली होती.

# रुपयाची घसरण थांबवायची तर...

भारतीय रुपया हा अमेरिकी डॉलरच्या तुलनेत मागच्या दोन वर्षांमध्ये पाच टक्क्यांनी उतरला आहे. गेल्या पाच वर्षांचा विचार केला, तर ही घसरण वीस टक्क्यांची आहे. केंद्रात डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकार असताना भारतीय रुपयाची घसरगुंडी झाल्याबरोबर देशाची प्रतिमा जगात मलिन होत असल्याची टीका तेव्हा विरोधी बाकांवर असलेले नेते करत होते. आता तीच मंडळी सत्तेवर आल्यावर या घसरगुंडीचा वेग उलट वाढला आहे. या पार्श्वभूमीवर दक्षिण आणि आग्नेय आशियातील सर्वात वाईट कामगिरी ही रुपयाची आहे, अशी टीका 'मूडीज' या आंतरराष्ट्रीय पतमापन संस्थेने केली आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाने ८६ रुपयांची मर्यादा ओलांडली आहे. मात्र भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन, हिंदुस्तान पेट्रोलियम, इंडियन ऑइल, अल्ट्राटेक सिमेंट, भारती एअरटेल आणि एएनआय टेक्नॉलॉजी यासारख्या कंपन्यांकडे डॉलरच्या तेजीवर मात करण्याची स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित असून त्यानुसार उपाययोजना केल्या जात असल्याचे निरीक्षण 'मूडीज'ने नोंदवले आहे. परंतु इतर कंपन्यांचे काय? भारतीय अर्थव्यवस्थेच्या विस्ताराचा वेग जगात सर्वाधिक आहे. अमेरिकेच्या वाढीचा वेग २.७ टक्के असून चीनच्या वाढीचा वेग ४.९ टक्के आहे. परंतु, अमेरिका आणि चीनचा विकास भारतापेक्षा कैकपट जास्त आहे. भारताची अर्थगती सहा-सात टक्क्यांच्या दरम्यान मागे-पुढे होत असते. भारतात मध्यमवर्ग आणि गोरगरिबांच्या मागणीत अनुक्रमे ३० टक्के आणि ६.९ टक्के घट झाली आहे. याचा अर्थ भाववाढ झाल्यामुळे त्यांच्या खिशात वेगवेगळ्या वस्तू विकत घेण्यासाठी पैसाच शिल्लक राहिलेला नाही. अन्नधान्य महागाई सहा टक्क्यांपेक्षा जास्त आहे. जनतेचा औषधे, वैद्यकीय सेवा यावरील वार्षिक खर्च सरासरी फक्त १४ टक्के वाढला आहे. शिक्षणक्षेत्रातील महागाई ११ टक्के आहे. त्यामुळे लोकांनी जगायचे तरी कसे असा प्रश्न उपस्थित होत आहे. अमेरिकी डॉलरची अधिकाधिक मजबुती हेच रुपयाच्या घसरणीचे एकमेव कारण असल्याचे मत अलीकडेच रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांनी व्यक्त केले आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाला सावरण्यासाठी कोणताही हस्तक्षेप केल्यास, देशाच्या निर्यातक्षेत्राला हानी पोहोचण्याची शक्यता आहे. सध्या रिझर्व्ह बँकेने केवळ रोजगारनिर्मिती आणि देशांतर्गत मागणी वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन डॉ. राजन यांनी केले आहे. त्यांच्या या मताची दखल केंद्र सरकारने अवश्य घेतली पाहिजे.

रिझर्व्ह बँकेने डॉलरच्या तुलनेत रुपयाला सावरण्याचा प्रयत्न करणे इतर सर्व चलनांच्या तुलनेत रुपयाला मजबूत करणारे ठरेल. त्यामुळे आपल्या निर्यातदारांसाठी ते हानिकारक होईल, हे लक्षात घ्यायला हवे. रुपयाला आधार देण्यापेक्षा खरी गरज आहे, ती भारताच्या घसरलेल्या विकासदराची काळजी करण्याची. चलन बाजारातील रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपामागे नेहमीच अस्थिरता कमी करणे आणि रुपयाची अंतिम पातळी बदलण्याचा प्रयत्न न करणे, असा दुहेरी हेतू राहिला आहे. सुदैवाने सद्यस्थितीत रिझर्व्ह बँकेने फारसा हस्तक्षेप केलेला नाही, हे नोंदवले पाहिजे. भारताने मात्र निर्यात वाढवण्यासाठी ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. मध्यंतरी बांगलादेशमधील शेख हसीना राजवट कोसळली. कापड उद्योगात बांगलादेश आघाडीवर आहे. परंतु वस्त्रोद्योगाला देशांतर्गत अस्थिरतेचा फटका बसला. अशा वेळी भारताने या परिस्थितीचा लाभ उठवण्याची गरज होती. पण तसे घडून आले नाही. ट्रम्प हे चीनविरोधी धोरणे राबतील, अशी शक्यता आहे. त्यांनी शुल्कांमध्ये वाढ करुन तसे दाखवून दिलेही आहे. अशा वेळी भारताने चीनला पर्याय बनण्याच्या दृष्टीने निवडक वस्तूंच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित करायला हवे. चालू आर्थिक वर्षात भारतातून केली जाणारी एकूण माल आणि सेवांची निर्यात ८१४ अब्ज अमेरिकी डॉलरएवढी असेल, असा होरा आहे. याचा अर्थ निर्यातवाढ सुमारे साडेपाच टक्क्यांनी होईल. वाढीचा हा वेग आनंदून जावे, असा नाही. गुणवत्ता, किंमत, पुरवठ्याचा वेग या तिन्ही बाबतीत भारताने सुधारणा घडवली पाहिजे. निर्याताभिमुख विकास हीच प्रगतीची गुरुकिल्ली ठरेल. भारताची आर्थिक वाढ आगामी काळात बाह्य घटकांपेक्षा देशांतर्गत घटकांवर अधिक अवलंबून असेल. जगभरातील व्यापाराचा वेग आता ठप्प झाला आहे. त्यामुळे भारताला आपल्या परकीय व्यापार धोरणात बदल करावे लागतील. युरोपसमोर अनेक राजकीय आणि आर्थिक आव्हाने आहेत. युरोपमधील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या जर्मनीला सलग दोन वर्षे मंदीचा सामना करावा लागत आहे. या वर्षी तेथे होणाऱ्या निवडणुकांमुळे राजकीय अस्थिरता आणखी वाढली आहे. फ्रान्समध्येही नुकत्याच झालेल्या निवडणुकांनंतर राजकीय गोंधळ उडाला आहे. ब्रिटनमध्ये नवे सरकार आले आहे; पण मजूर पक्ष आर्थिक आव्हाने आणि आर्थिक मंदीचा सामना करत आहे. एकूणच, युरोपवर आपली स्पर्धात्मकता कायम ठेवण्याचा दबाव आहे. अक्षय ऊर्जेकडे वाटचाल केल्यामुळे ऊर्जेचा वाढता खर्च हा दबाव आणखी वाढवत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेवर या समस्यांचा परिणाम झाला आहे.

# क्रांतीकारी संत रविदास महाराज!

**रविदास** महाराज यांचा जन्म चौदाव्या शतकात उत्तर प्रदेश मधील काशी या ठिकाणी चर्मकार कुटुंबात झाला. त्यांच्या जन्म तारखेबाबत तफावत आहे.म्हणुन फेब्रुवारी महिन्यातील माघ पौर्णिमा हि तारीख निश्चित करण्यात आली आहे. ज्या काळात त्यांचा जन्म झाला त्याकाळी जातीयवाद, विषमतावाद, अन्याय, अत्याचार, अज्ञान, अंधश्रद्धा, या दुर्गंधीने संपूर्ण वातावरण दुषीत होते. याकाळात सर्व खालच्या वर्गात गणल्या गेलेल्या अस्पृश्य लोकांना शिक्षणासोबत सर्व गोष्टीची बंदी होती. अशा परिस्थितीत सुध्दा संत रविदास महाराज यांनी शिक्षण घेतले आणि सोबत सहा भाषेचे ज्ञान अवगत केले.



चप्पल जोडे शिवणे हा व्यवसाय जातीव्यवस्थेने नशीबी बांधून दिलाच होता. त्यामुळे ज्या जातीचा माणूस त्याच जातीतला व्यवसाय करणे भाग होते. म्हणून संत रविदास महाराज यांचे वडील,सुध्दा चपला जोडे शिवण्याचे काम करत होते. अशा परिस्थितीत संत रविदासांना सुध्दा जातीव्यवस्थेचे चटके सोसावे लागले.त्यांना सुध्दा हा अन्याय सोसावा लागला. परंतु त्यांच्याच्याने हा अन्याय, अत्याचार सहन झाला नाही. कुठपर्यंत मुके राहायचे या जातीव्यवस्थेविरुध्द आवाज उठवलाच पाहिजे. याचा प्रतिकार केलाच पाहिजे. अन्यथा हे दुषित वातावरण वाढतच राहिलं. आणि कितीतरी लोकांचे जीवनमान उध्वस्त करेल. म्हणून आता मुके राहून चालणार नाही आता बोलते झाले पाहिजे. तुकाराम महाराजांनी म्हटलेल्या अभंगाप्रमाणे. काय करु आता धरुनीया भीड!*नि:शंक हे तोंड वाजविले पाहिजे!नव्हे जगी कोण मुकीयाचा जाण!सार्थक लाजुनी नव्हे हित!

लोक शिक्षणाच्या अभावी बोलू शकत नाही. ते अज्ञान आहेत. म्हणून आता भिऊन चालणार नाही. आता या जाती, व वर्णव्यवस्थे विरुद्ध बोललेच पाहिजे.

आणि म्हणुन संत रविदास महाराजांनी आपल्या दोह्याच्या माध्यमातून जातीव्यवस्थेवर प्रहार केला. चाम के तुम भी और चाम के हम भी!चाम का है जग सारा!चाम के बिन कौन जीव है!कहे रविदास चमारा! पृथ्वीवर प्रत्येक जीव म्हणजे माणूस हा चामड्याचा बनलेला आहे.प्रतेकाच्या अंगावर चामडे आहे. फक्त चामड्यामध्ये काळा आणि गोरा हा एवढाच फरक आहे.ब्राम्हणाच्या अंगावर सोन्याची कातडी,आणखी इतर जातीच्या लोकांच्या अंगावर चांदी किंवा पितळेची कातडी असे तर नाही.अवयव पण सारखेच. मग तरी एवढा भेदभाव का? एवढा जातीवाद का? हा जातीवाद, वर्णवाद मिटावा यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. विषमतेने बरबटलेल्या या भारतभुमीत सामान्य भोळ्या भाबड्या जनतेला कर्मकांड, अंधश्रद्धा आणि अज्ञान यामध्ये गुरफटवून त्यांची पिळवणूक केली जात होती. अन्नाविना,पाण्याविना माणसे तडफफडत होती. ते मिळत नव्हते.माणुस माणसाच्या स्पर्शाने बाटत होता.आणि पशुच्या गोमुत्राने शुद्ध होत होता.माणुसच माणसाची पिळवणूक करत होता.तिरस्कार करत होता.आणि याला कारणीभूत होती ती म्हणजे 'जात'.जातीपातीच्या या फेऱ्यात अडकल्यामुळे जात नावाचा भयंकर रोग माणसाला जडलेला होता. (व आजही तो आहे) हे त्यांनी पाहिले.आणि याविरुद्ध आपल्या दोह्याच्या माध्यमातून त्यांनी जातीव्यवस्थेवर ती मिटवण्यासाठी प्रहार केला.संपूर्ण भारतभर ते फिरले.

जात पात के फेर मे! उलझत है सब लोग! मानवता को खा रहा है!रविदास जात का रोग!

म्हणून रविदास महाराज म्हणत जोपर्यंत माणूस या जातीच्या रोगातून बाहेर निघत नाही. तोपर्यंत माणुस माणसाशी जुळणार नाही.तोपर्यंत माणूस माणसासी माणसासारखा वागणार नाही. म्हणुन ते म्हणत माणसाने जातीयतेच्या या बंधनातून बाहेर पडावे. जात जात मे जात है। जो केले के पात!रविदास माणुस न जुड़े सके!जबतक जात न जात!

केळीचे झाड जसे पानांनी वेढलेले आहे. तशा या जाती निर्माण केल्या आहेत.आणि जोपर्यंत या जाती नष्ट होणार नाही.तोपर्यंत माणूस एकमेकांशी जुळणार नाही.अशा प्रकारे रविदास महाराज भारतभर फिरले आणि आपल्या दोह्याच्या माध्यमातून अनिष्ट गोष्टीवर प्रहार केला.आणि समता,बंधुत्ववादाचा पुरस्कार केला.आपल्या एका दोह्यात ते म्हणतात. ऐसा चाहू राज मै,जहां मिले सबन को अन्न!

छोटे बडे सब सम बैठे, रविदास रहे प्रसन्न!

असे राज्य बनो की, कोणीही मोठे नाही,कोणी लहान नाही.सर्व समान राहुल,माणूस माणसाशी बंधुभावाने राहो.आणि सर्वांना अन्न,वस्त्र,निवारा मिळो. कोणी कोणाची पिळवणूक ना करो. कोणावर अन्याय अत्याचार ना करो. किती समतावादी, उदात्त व पराकोटीचे विचार आपल्या दोह्याच्या माध्यमातून संत रविदासांनी मांडले.

ते आपल्या एका दोह्यात लिहितात. मन चंगा तो कटौती मे गंगा! मन स्वच्छ, निर्मळ, पवित्र असेल, कर्म चांगले असतील,तर गंगेत डुबकी मारण्याची गरजच नाही. ते म्हणतं

मन ही पुजा, मन ही धुप! मन ही सेहू, सहज स्वरुप! मनच चांगल्या आणि वाईट गोष्टीचे उगम स्थान आहे. मनावर पहारा ठेवा, त्या मनात वाईट विचाराला प्रवेश करु देऊ नका. चांगल्या गोष्टी करण्याकडे मनाचा कल ठेवा. एका गाण्याचे बोल आहेत.

मन मे खोट भरी,और मुख मे हरी!फिर मंदिर जानेसे क्या फायदा!मैल मन का ना धोया,बदन धो लिया,तो गंगा नहाने से क्या फायदा!

संत कबीरांनी म्हटल्याप्रमाणे,

मल मल धोय शरीर को,धोया ना मन का मैल,नहाए गंगा गोमती,रहे बैल के बैल!

कितीही वेळी गंगेच्या पाण्यात आंघोळ केली.पण मन जोपर्यंत पवित्र व निर्मळ होत नाही. तोपर्यंत काही फायदा नाही.उलट आम्ही पवित्र गंगा मैली करण्याचं काम करतो.

अशा या थोर समतेचे विचार पेरणाया संत रविदास महाराजांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 'द अनटचेबल' हा १९४८ मध्ये लिहलेला ग्रंथ समर्पित केला. अशा या थोर संताला २एप्रिल १५२० रोजी वर्णव्यवस्थेविरुध्द बंड पुकारले म्हणून मनुवादी विचाराच्या लोकांनी विश्वासघात करून मारले. आणि त्यांचा इतिहास लुप्त करण्याचा प्रयत्न केला. पण इतिहासात खऱ्याला स्थान आहे. खोट्याला नाही. इतिहासात खोटे कितीही घुसवण्याचा प्रयत्न केला तरी, इतिहास ते स्विकारत नाही.इतिहासातून ते बाहेर फेकले जाते.आणि सत्य कितीही लपवण्याचा प्रयत्न केला,तरी सत्य लपवून ठेवल्या जात नाही.कारण निसर्गाने या पृथ्वीवर खरे खोटे ओळखणारे सत्याचा शोध घेणारे काही लोक सुध्दा निर्माण केले आहेत.म्हणुन आज सहासे वर्षानंतर सुध्दा संत रविदास महाराजां इतिहास लिहणारे, सांगणारे लोक आहेत.त्यांची जयंती साजरी करणारे लोक आहेत. पण ज्या चर्मकार समाजात त्यांचा जन्म झाला त्या समाजातील लोकांनी बुवाबाजी व कर्मकांडात न गुरफटता रविदास महाराजांचे हे सत्य ज्ञान जगासमोर मांडण्यासाठी पुढे आले पाहिजे.


**- विनोद सरदार.**
फुले आंबेडकर
विद्वत सभा.
मो.नं.९६८९८४७११५


रविदास यांचा जन्म सन १३९८ मध्ये काशी येथे झाला. चर्मकार समाजाच्या रविदासांचा वडिलोपार्जित धंदाही चामड्यापासून पादत्राणे व अन्य वस्तू बनविणे हा होता. परंतु, रविदास लहानपणापासून ईश्वरभक्तीकडेही वळले होते. वाईट कर्म त्यागून परमेश्वर भक्तीकडे जा तोच खरा मार्ग आहे, असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या जीवनातील अनेक घटना याची साक्ष देर्णाया आहेत.

रविदास संत कबीरांचे गुरूबंधू होते. स्वामी रामानंद हे त्यांचे गुरू. रविदासांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजाला उपदेश केला. सतमार्गावरून चालण्यासाठी केलेला त्यांचा उपदेश आजही अंगीकारण्यासारखा आहे. विशेष म्हणजे त्यांच्या भक्तीसाहित्यात नेहमीच्या बोलीतले शब्द होते. त्यामुळे त्यांचे साहित्य लोकांना भावले. त्याशिवाय पारतंत्र्याविषयीची बंडखोरीही रविदासांच्या साहित्यातून दिसून येते. ज्यावेळी मुस्लिम आक्रमक भारतात शिरले त्यावेळी त्यांनी लादलेल्या पारतंत्र्याविषयी रविदासांनी स्पष्टपणे लिहून ठेवले आहे.

**पराधिनता पाप है जान लेहु रे मीत**
**रविदास दास पराधीन तो कौन करे है प्रीत**

सामान्याने पराधिनतेला दूर करण्यासाठी निर्भय बनले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. गुलाम होणे हे पाप आहे. अशी त्यांची शिकवण होती.

रविदासांनी त्या काळी समाजवादाची तुतारी फ्फुंकली होती. स्वतः चर्मकार जातीतून आले असले तरी त्यांना असा सामाजिक भेदभाव अमान्य होता. आपण सगळे एक आहोत, अशी त्यांची भावना होती. त्यांच्या दोह्यातूनही त्यांनी ती मांडली. प्रत्येक जण आपल्या मेहनतीनेच जगतो. कर्म करणाऱ्यांना कुणाशी घाबरण्याचे काही कारण नाही. घाबरलात तर संपलात. गुलामी केलीत तर तुमच्यावर कुणीही प्रेम करणार नाही असा इशाराही ते देतात. सामाजिक एकोप्याचे उदाहरण त्यांनी त्यांच्या एका दोह्यातून फ्फार छानपणे मांडले आहे.

एकै माटी के सम झांडे, सबका एको सिरजनहारा
रविदास व्यापै एकों घट भीतर, सभको एकै घडै कुम्हारा

सर्व जीव एकाच मातीतून बनलेली भांडी आहेत. त्यांना बनविणाराही एकच आहे. एकाच परमात्म्याची ही सारी रूपे आहेत. इथे कोणी छोटा मोठा नाही. मेहनतीलाच प्रभूभक्ती समजतो त्याचे जीवनच यशस्वी होईल, असे ते सांगतात.

समाजवादी विचारसरणी मांडणारे ते संत होते. त्यांचा समाजवाद खालील ओळीतूनही दिसून येतो.

**ऐसा चाहो राज्य में, जहां मिले सबन को अन्न**
**छोट बडो सब सम बसे रविदास रसे प्रसन्न**

रविदासांनी कर्म हीच ईश्वररसेवा मानली होती. इथे महाराष्ट्रातल्या गोरा कुंभाराशी ते नाते जोडतात. गोरा कुंभाराने काम करता करता विठ्ठल नाम घेतले आणि त्या नादात स्वतःच्या मुलालाही त्यांनी मातीत कालवून टाकले होते.

रविदासही काम करता करताच ईश्वरभक्तीत लीन होत होते. एकदा त्यांना गंगेवर चलण्यासाठी काही लोकांनी सांगितले. परंतु, आज एका व्यक्तीला पादत्राणे बनवून देण्याचे वचन दिले असल्याने मी येऊ शकत नाही, असे स्पष्टपणे सांगून काम हीच आपली ईश्वरभक्ती असल्याचे त्यांनी दाखवून दिले होते. 'मन चंगा तो कठोती में गंगा' मन चांगले असेल तर गंगा आपल्याजवळच असेल या आशयाचा हिंदी वाक्प्रचारही त्यांच्याच दोह्यातून आला आहे.

# वृक्षारोपण व संवर्धन सामाजिक जबाबदारी - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

**पर्यावरण** संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षांची जोपासना करुन खऱ्या अर्थाने संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकांची सामाजिक जबाबदारी आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.

सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने संत एकनाथ रंगमंदीर येथे वृक्ष उत्पादक आणि वृक्ष खरेदीदार मेळाव्याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री स्वामी बोलत होते. यावेळी विभागीय वन अधिकारी किर्ती जमदाडे- कोकाटे, उपवनसंरक्षक सुवर्ण माने, मानद वन्यजीवरक्षक किशोर पाठक, हिमायत बाग फळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. संजय पाटील उपस्थित होते.




जिल्हाधिकारी श्री स्वामी म्हणाले, सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून वनसंवर्धनाबाबत चांगले काम होत आहे. वृक्ष उत्पादक आणि वृक्ष खरेदीदार मेळाव्यात वनसंवर्धनाला गती देणाऱ्या सर्व विषयांचा समावेश करण्यात आला आहे. वृक्षलागवड मोठया प्रमाणात होते मात्र लागवड केलेल्या वृक्षापैकी किती वृक्ष जिवंत राहतात, हे महत्त्वाचे आहे.

सोलापूर येथे काम करताना आषाढी एकादशीला येणाऱ्या वारकरी बांधवांना विसावा मिळावा यासाठी त्यावेळी दिंडयाच्या प्रवेशापासून ते पंढरपुर पर्यंतच्या रस्त्यावर वारकरी बांधवांच्या हस्ते झाडे लावली. आज ही झाडे चांगली बहरली आहेत. वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे म्हणून थांबून चालणार नाही, आजच्या नवीन पिढीमध्ये ही बाब रूजवावी लागणार आहे.

आपल्या पुढच्या पिढीसाठी चांगले पर्यावरण आहे का, याचा विचार प्रत्येकाने करण्याची गरज असल्याचे सांगून जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले, छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी म्हणून पदभार स्विकारल्यानंतर कामाच्या निमित्ताने अनेक गावात गेलो, त्यावेळी गावात वडाचे झाडे मात्र दिसत नव्हते.

एक वडाचे झाड संपूर्ण गावाला शुदध हवा देते, वनविभागासोबत बैठक घेत जिल्हयातील प्रत्येक गावात वडाच्या पाच वृक्षांची लागवड करण्याचा निर्णय घेतला. निसर्गाने आपल्याला भरभरून दिले आहे.

निस्वार्थपणे मानव जातीची निसर्गाने सेवा केली आहे. श्वास टिकवायचा असेल तर निसर्ग टिकवला पाहीजे. वृक्ष संवर्धन केले पाहीजे. वृक्ष लागवडीला चालना दिली पाहीजे.

कोरोना काळात आपल्याला हवेची किंमत समजली आहे. त्यामुळे यापुढील कालावधीत पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने पुढे यायला पाहीजे. आजच्या कार्यशाळेत बांबु लागवड, चंदन शेती हे महत्त्वाचे विषय घेतले आहे. बांबु लागवडीला जगात खुप महत्त्व आले आहे. दोन तीन देशात संपूर्ण विमानतळ, हॉटेल बांबुपासून बनविण्यात आले आहे. आंतरराष्टीय बाजारपेठेत बांबुची मागणी आहे. बांबु, चंदन, फळबाग याबाबतचे अर्थशास्त्र समजून घ्यायला पाहीजे. चंदन, बांबु यांना बाजारपेठेत मागणी आहे. वृक्ष लागवड करताना पूरक व्यवसाय म्हणून अनेक शेतकरी पुढे येत असल्याचा उल्लेखही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केला.

वृक्ष लागवडीच्या बाबतीतही शेतकऱ्यांनी एकत्रित यायला पाहीजे, याबाबतच्या बाजारपेठेबाबतही शेतकऱ्यांमध्ये चर्चा व्हायला पाहीजे. वृक्षारोपन कार्यक्रमापुरते नाही तर सातत्याने यामध्ये प्रत्येकाने सहभाग घ्यायला हवा. नवीन पिढीचा यातील सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. वृक्ष लागवड व खरेदीदार यांची एकत्रित साखळी तयार होत असताना यामध्ये प्रक्रिया, बाजारपेठ, अर्थशास्त्रज्ञ यांचा सहभाग महत्त्वाचा ठरेल, असेही जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले.

विभागीय वन अधिकारी किर्ती जमदाडे-कोकाटे यांनी प्रास्ताविक केले. छत्रपती संभाजीनगर,जालना, परभणी व हिंगोली या चार जिल्हयांतील वृक्ष उत्पादक आणि वृक्ष खरेदीदार यांचा आजचा मेळावा त्यातील लाभार्थी शेतकऱ्यांचे अनुभव इतरांना प्रेरणा देणारे ठरतील. आपण सर्व मिळून राज्याला हरित करण्यासाठी योगदान देवूया, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी उपवनसंरक्षक सुवर्ण माने यांनी आजच्या वातावरणीय बदलाबाबत माहिती दिली. यावेळी छत्रपती संभाजीनगर,जालना, परभणी व हिंगोली या चार जिल्हयांतील वृक्ष उत्पादक आणि वृक्ष खरेदीदार उपस्थित होते.

# नवसाला पावणारी म्हैसमाळची श्री गिरिजादेवी

**आख्यायिका**

**गिरीजादेवी** हे मराठवाड्यातील जाज्वल्य दैवत. छत्रपती संभाजीनगरपासून ३३ किलोमीटर अंतरावर खुलताबाद तालुक्यात म्हैसमाळ थंड हवेचे ठिकाण आहे. खुलताबादपासून ते अवघ्या ११ किलोमीटरवर आहे. 'मराठवाड्याचे महाबळेश्वर' किंवा 'प्रति महाबळेश्वर' म्हणून म्हैसमाळ ओळखले जाते. कडाक्याच्या थंडीबरोबर माघ पौर्णिमेला म्हैसमाळच्या श्री गिरिजादेवीची जत्रा भरते. रेवड्यांच्या प्रसादाची उधळण या यात्रेत होते. बैलगाडी, मोटारींनी या जत्रेसाठी भाविक मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. म्हैसमाळ येथे साक्षात शंकराने वास केला होता. अशी अख्यायिका आहे. म्हणून 'महेशाचे माळ' अर्थात 'महेशमाळ' म्हैसमाळ, श्रीगिरीजादेवी मंदिराबरोबरच श्री. व्यंकटेश मंदिर, गोरक्षनाथाची गुहा, दूरदर्शनचे सहप्रक्षेपण केंद्र यासाठी म्हैसमाळ प्रसिद्ध आहे. भाविकांचे आशास्थान व मराठवाड्याचे कुलदैवत श्री गिरीजादेवीची जत्रा माघ एकादशीला 'श्री'च्या काठीची प्रतिष्ठापना करण्यात येऊन प्रारंभ होईल. माघ पौर्णिमेच्या दिवशी (१२ फेब्रुवारी २०२५) श्री गिरिजादेवीची पूजा-अर्चा, अभिषेक करण्यात येईल. देवीचे जुने ठाणे म्हणून प्रसिद्ध असलेल्या ठिकाणीही महापूजा केली जाते.

श्रीगिरिजादेवीच्या अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. श्रीगिरिजादेवी म्हणजे पार्वतीचा अवतार शिवालय माहात्म्यातील पाचव्या अध्यायामध्ये याचा संदर्भ सापडतो. या अध्यायात म्हटले आहे की, महेशाद्रीच्या शिखरापासून पुण्यकारक एक नदी उगम पावली. म्हैसमाळच्या पूर्व दिशेला गावापासून दोन किलोमीटर अंतरावर एक कुंड आहे. तेथेच गिरिजा नदी उगम पावली आहे. हेच श्रीगिरिजादेवीचे मुख्य ठाणे मानले जाते. एका कथेनुसार खुलताबाद तालुक्यातील भडजी हे गाव देवीचे माहेर, तर लामणगाव हे सासर. एकदा श्रीगिरिजादेवी आपल्या पतीला भोजन घेऊन जात असतानाच महादेवाने पार्वतीची परीक्षा घेण्याचे ठरविले. त्यांनी अन्नाला कावळ्याच्या रूपात येऊन स्पर्श केला. अन्न उष्टे झाले. पतीला आता उष्टे अन्न कसे न्यावे, असा प्रश्न तिला पडला. देवीने धरतीमातेला विनवणी केली. उष्टे झालेले अन्न माझ्या पतीला कसे काय घेऊन जाऊ? त्याकरिता आता मला धरतीमाते तुझ्या उदरात सामावून घे! तथास्तु, विनंती मान्य



होताच श्रीगिरिजादेवी धरतीच्या उदरात गुप्त झाली.

महादेवाला संकट पडले, आता काय करावे, महादेवाच्या आज्ञेने योगीराज महाराज यांनी कठोर तपश्चर्या केली. योगीराज महाराजांनी देवीला प्रसन्न केले व गावात यायचे आमंत्रण दिले. देवी प्रसन्न होऊन म्हणाली, 'मला तू आपल्या पाठीवर घेऊन चल. रस्त्यात कुठेही थांबायचे नाही. मागे वळून पाहायचे नाही.' त्यानुसार योगीराज महाराज यांनी देवीला पाठीवर बसविले. चालताना ते थकले. थकवा आल्याने एका ठिकाणी ते टेकले. आज जेथे श्रीगिरिजादेवीचे मंदिर आहे तेथेच देवी अंतर्धान पावली, अशी ही आख्यायिका आहे.

आज ज्या ठिकाणी श्रीगिरिजादेवीचे मंदिर आहे तिथेच योगीराज महाराज यांची समाधी आहे. मंदिराजवळच पुरातन औदुंबर तीर्थकुंड आहे.

या तीर्थकुंडात स्नान करून देवीचे दर्शन घेतल्यास पुण्य तर लाभतेच; परंतु असाध्य रोग बरा होतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. श्रीगिरिजादेवीच्या अनेक पौराणिक कथा प्रसिद्ध आहेत. श्रीकाशीखंड व ग्रंथातील एकोणपन्नासाव्या अध्यायामध्ये अशी कथा आहे की, एकदा महादेवी-पार्वती कैलाशावर सारिपाट खेळत असताना महादेव हरल्यामुळे दक्षिणेकडे एकटेच निघून गेले.

पर्वतीने भिल्लीणीचे रूपधारण करून आपल्या श्रृंगाराने महादेवाला प्रसन्न केले. म्हैसमाळ येथील या वनास 'काम्यकवन', 'उमावन' म्हणून ओळखले जाते. याविषयी श्रीक्षेत्र वेरूळ येथील संत विनायकबुवा टोपरे यांनी 'ब्रह्मसरोवर' या ग्रंथात माहिती दिली आहे. यामध्ये म्हटले आहे की, काम्यवनात शिव-पार्वती रतिक्रीडा करीत असताना पार्वतीस संकोच वाटल्यावरून शंकराने या वनात येणारा पुरूष स्त्री होईल, असा शाप दिला.

पुढे श्राद्धदेवाचा पुत्र सुधन्वा मृगयेसाठी या वनात शिकारीसाठी आला असता स्त्री झाला. स्त्री रूपी सुधन्वास चंद्राचा पुत्र बुध आपल्यासोबत घेऊन गेला. स्त्रीरूपी राजास सत्यकथा सांगून शापमुक्त होण्यासाठी शिवाची तपश्चर्या करण्यास सांगितले. श्रीक्षेत्र वेरूळ येथील शिवालयाच्या काठी तिने तपश्चर्या केली.

शंकराने पुण्य-सरिता होशील, असा वर दिला. तिच्या पूर्वजन्मीच्या नावावर तिला इला हे नाव दिले. हिच इला पुढे एलगंगा म्हणून प्रसिद्ध झाली. या एलगंगेचा उगम म्हैसमाळ येथूनच झाला. श्रीदेवीस इनामी जमिनी दिलेल्या असून अखंड नंदादीप, देवस्थानचा खर्च यातून भागविला जातो. जत्रेसाठी भाविक मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.

## कर्करुग्ण निदान वाहनाचे लोकार्पण




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

ग्रामीण रुग्णालय पाचोड ता. पैठण येथे रविवार दि.९ रोजी कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन चे लोकार्पण करण्यात आले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते दूरदृष्य प्रणाली द्वारे हा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यात छत्रपती संभाजीनगर परिमंडळात पाचोड येथे हा लोकार्पण सोहळा सरपंच शिवराज भुमरे, सभापती राजू भुमरे,सहाय्यक उपसंचालक डॉ.भूषण रामटेके,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दयानंद मोतीपवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

डॉ.महेश लड्डा, डॉ.अनिल पवार, लुका आरोग्य अधिकारी डॉ.सय्यद अजहर, डॉ.संदिपान काळे,चंदन गणोरे, ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी, आशास्वयंसेविका यांच्या उपस्थितीत पार पडला.

### ... अशी आहे व्हॅन

व्हॅनमध्ये डेंटल चेअरसह मुखरोग कॅन्सर तपासणीची साधनसामग्री, सॉफ्टवेअरद्वारे मुख कर्करोग तपासणी लॅपटॉप, पाणी व वीज सुविधांनी युक्त सुसज्ज युनिट आणि रेफ्रिजरेटरची सुविधा आहे. स्त्रियांमधील स्तन कर्करोग तपासणीसाठी स्त्रीरोगतज्ज्ञ, परिचारिका, स्वतंत्र कक्ष, गर्भाशय मुख कर्करोग तपासणीसाठी स्वतंत्र बेड, कोलकोस्कोपीची सुविधा असेल. बायोप्सीची आवशकता असल्यास तशी सुविधा पुरविण्यात येईल. मुख कर्क, गर्भ कर्करोग ग्रस्त रुग्णांनी सदर वाहनाचा जास्तीत जास्त उपयोग करावा असे आवाहन उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. कांचन वानोरे यांनी केले आहे.

## 'सिपेट'तर्फे कौशल्य विकास प्रशिक्षण

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्रीय पेट्रो रसायन अभियांत्रिकी व उद्योग संस्था व महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने १० वी उत्तीर्ण उमेदवारांसाठी सहा महिने कालावधीचे विनामूल्य प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले आहे. मशिन ऑपरेटर प्लास्टिक प्रोसेसिंग, मशिन ऑपरेटर इंजेक्शन मोल्डिंग अशा दोन अभ्यासक्रमांसाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण असलेले १८ ते ४५ वयोगटातील उमेदवार अर्ज करु शकता. हा अभ्यासक्रम ६ महिने कालावधीचा असून ३०० प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. महाराष्ट्राचे रहिवासी असलेले इमाव, भज, विमाप्र अशा प्रवर्गातील नॉनक्रिमीलेयर संवर्गातील उमेदवार अर्ज करु शकता. अर्जासोबत जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, इयत्ता १० वी १२ वी , आयटीआय, पदविका गुणपत्रक, प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, पासपोर्ट फोटो इ. सर्व कागदपत्रे जोडावी. अधिक माहितीसाठी व अर्ज जमा सादर करण्यासाठी केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्थान (सिपेट), रसायन एवं पेट्रोकेमिकल्स विभाग, रसायन आणि उर्वरक मंत्रालय, भारत सरकार, प्लॉट नं. जे-३/२, एमआयडीसी औद्योगिक क्षेत्र, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर. संपर्क- ०२४०-२४७८३१७, मोबाईल ९३२५६८७९१०, ९१४५६७५५८५ इमेल- aurangabad@ciet.gov.in

## सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

समाजकल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. त्या अनुषंगाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहु, फुले, आंबेडकर पारितोषिक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार या पुरस्कारासाठी संबंधीत व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांकडुन शनिवार दि.१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे.

या पुरस्काराची माहिती व अर्जाचा नमुना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या htts://sjsa.maharashtra.goi.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी इच्छुक व्यक्ती व संस्थांनी दि.१५ पर्यंत आपले अर्ज विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह सहायक आयुक्त, समाजकल्याण, छत्रपती संभाजीनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपूरा, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात दाखल करावेत असे आवाहन सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे.

## महाज्योतीतर्फे इतर मागासवर्गीय बेरोजगार युवक, युवतींसाठी; मोफत निवासी कौशल्य विकास प्रशिक्षण

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्रीय पेट्रो रसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्थान (सिपेट) ही एक राष्ट्रीय संस्था असून रसायन आणि पेट्रो रसायन विभाग, रसायन व उर्वरक मंत्रालयांतर्गत भारत सरकारद्वारे प्लास्टिकशी संबंधित उद्योगाच्या संशोधन व विकासकामात तंत्रज्ञान सहाय्य करण्याचे कार्य करते. महाराष्ट्रातील प्लास्टिक उद्योग व संबंधित उद्योगांना तांत्रिक सहाय्य पुरविणे व मनुष्यबळाचा विकास करणे या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर येथे सिपेटची स्थापना २००६-२००७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या सहाय्याने केंद्र सरकारने केली आहे.

सिपेट, छत्रपती संभाजीनगर येथे महाज्योती नागपूरमार्फत २०२४-२५ साठी राज्यातील इतर मागासवर्गीय जातीच्या बेरोजगार युवक, युवतींसाठी निवासी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. महाज्योती, नागपूर व सिपेट छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बेरोजगार इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासवर्गातील युवक, युवतींसाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत अभ्यासक्रमासाठी नमूद पात्रताधारक व नॉनक्रिमीलेयर गटातील उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

मशिन ऑपरेटर - प्लास्टिक प्रोसेसिंग व मशिन ऑपरेटर - इंजेक्शन मोल्डिंग या अभ्यासक्रमांच्या प्रशिक्षणासाठी उमेदवार किमान १० वी पास असणे आवश्यक आहे. उमेदवार १८ ते ४५ वर्ष वयोगटातील असावा. दोन्ही अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणाचा कालावधी एकूण ९६० तास (६ महिने) राहणार असून प्रत्येक अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणासाठी ३०० उमेदवारांना प्रवेश देण्यात येणार आहे. राज्यातील रहिवासी असलेले ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थी अर्ज करू शकतात. उमेदवार हा नॉनक्रिमिलेअर असावा. उमेदवारांनी सिपेट, सी.एस.टी.एस. छत्रपती संभाजीनगरच्या www.ciet.gov.in/Centers/Ciet-Aurangabad या वेबसाईटवरील अर्जाची प्रिंट काढून त्यासोबत जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, १० वी, १२ वी, आय.टी.आय., पदविका, ची गुणपत्रिका, शाळा, महाविद्यालय सोडल्याचा दाखला (टी.सी.), उत्पनाचा दाखला रहिवासी दाखला, डोमीसाईल प्रमाणपत्र, आधार कार्ड, पासपोर्ट साईज ४ फोटो, इत्यादी सर्व कागदपत्रांच्या दोन छायांकित प्रती जोडून त्या पोस्टाद्वारे केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्थान (सिपेट), (रसायन एवं पेट्रोकेमिकल विभाग, रसायन आणि उर्वरक मंत्रालय, भारत सरकार) प्लॉट नंबर जे-३/२, एम.आई.डी.सी. औद्योगिक क्षेत्र, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर या पत्त्यावर पाठवाव्यात. अधिक माहितीसाठी ०२४०-२४७८३१७, ९३२५६८७९१०, ९१४५६७५५८५ किंवा vtc-aurangabad@ci{et.gov.in या वेबसाईटवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशिक्षण अधिकारी, सिपेट, सीएसटीएस, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. धानोरकर यांच्या क्षेत्रीय कार्यालयांना भेटी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांकरीता ७ कलमी कृती आराखडा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याअनुषंगाने सोमवार दि.१० व मंगळवार दि.११ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी गंगापूर तालुक्यातील आरोग्य केंद्र व तालुकास्तरीय कार्यालयांना भेटी दिल्या.

त्यात जि.प. बांध उपविभाग प्रा.आ.केंद्र. जिकठाण, शेंदूरवादा, लासूर स्टेशन, पशुवैद्यकीय दवाखाना गंगापुर व शेंदूरवाडा प्रा.आ.केंद्र. सि. वडगांव, वालुज, भेंडाळा, पशुवैद्यकीय दवाखाना तुर्काबाद यांचा समावेश होता.

त्यांचेसमवेत जिल्हा आयुष अधिकारी डॉ. शेख शकील, चंद्रभान.डी. बनसोडे, अनिल गाढे, विजय काटे, कनिष्ठ अभियंता उत्तम पवार, भारत कांबळे, विशाल ताठे, बी.एस. थोरात आदी उपस्थित होते.

## नगर परिषदेच्या गलथान कारभाराचा नागरिकांना भुर्दंड; जबाबदार अधिकाऱ्याकडून खर्च वसूल करण्याची मागणी



**सेलू (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सेलू शहरात विकासकामांचा धडाका मागील काही दिवसांपासून सुरू आहे.नवीन रस्ते,नाली,सुशोभीकरण आदी नागरिकांच्या सुविधेसाठी करण्यात येत आहे.याचाच भाग म्हणून छत्रपती शिवाजी महाराज ते मदरसा पर्यंत असलेला रस्ता हा नगर परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला वर्ग करून नवीन राज्य महामार्ग गेल्यावर्षी तयार करण्यात आला होता.या राज्य महामार्गावर दळण वळण मोठ्या प्रमाणत वाढलेले असून नागरी वस्ती मुळे दरदिवशी अनेक अपघात होत आहेत.त्यातच भरीस भर म्हणून वालूर नाका परिसरात जलवाहिनी जोडणीचे काम मागील दीड महिन्यापासून हाती घेण्यात आले असून नवीन झालेल्या रोडवर मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले आहे.

अद्यापही हे काम पूर्ण झालेले नसून नवीनच झालेल्या राज्य महामार्गाचे मोठे नुकसान करण्यात आले आहे.हा राज्य महामार्ग बनविण्याचे काम सुरू असताना अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अंतर्गत असलेल्या जलवाहिनीचे काम त्याच वेळी हाती घेवून पूर्ण केले गेले नाही त्यामुळे सद्यस्थितीत नवीन झालेला रोड खोदून जोडणी करण्यात येत आहे.

## सैन्यदलात अधिकारी होण्याची संधी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

५८ व्या शॉर्ट सर्व्हिस कमिशन एन.सी.सी. स्पेशल प्रवेश योजना २०२५ अंतर्गत अधिकारी भरती होत आहे. या भरतीसाठी उमेदवार एन.सी.सी. सी प्रमाणपत्र धारक पदवीधर असावा. www.joinindianarmy.nic.in या संकेतस्थळावर दि.१४ फेब्रुवारी ते १५ मार्च या दरम्यान अर्ज करता येईल. अधिक माहितीसाठी हेच संकेतस्थळ पहावे. सर्व एन.सी.सी. कॅडेट व युद्धात शहीद जवानांचे अवलंबित यांनी या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# राजाबाजार जैन मंदिराचा ४६वा वर्धापन दिवस मोठया भक्तीभावाने साजरा

## वर्धापन दिवसाचे औचित्य साधुन शेकडो भाविकांनी घेतले भगवान शांतीनाथचे दर्शन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार चा ४६ वा वर्धापनदिन आज ९ फेब्रुवारी २०२५रोजी मोठया उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. सकाळी ८.०० वाजता धर्म ध्वजारोहण पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा, निखिल कीरन गंगवाल जिवन प्रकाश जैन अशोक जैन आ ज्ञानमती माताजी सघपती यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी कीरन पहाडे, अरफ्ण पाटणी, महावीर ठोले,यतीन ठोले, जितेंद्र पाटणी, संतोष सेठी, निता ठोले, चंदा कासलीवाल, ॲड.अनिल कासलीवाल, प्रमोद जैन, संतोष पापडीवाल, अशोक छाबडा, ताराबाई कासलीवाल, प्रकाश कासलीवाल राजेंद्र सेठी दिनेश ठोले डा शैलेश चादीवाल आदी उपस्थित होते. या प्रसंगी ध्वजगीत पंडित प्रविण काळे यांनी गायले. भगवंताच्या अभिषेक प्रसंगी काशमीरा लोहाडे भरत पापडीवाल, संतोष बाकलीवाल, सचिन चुडीवाल, काताबाई पहाडे, संगीता गंगवाल, संगीता सेठी, रितेश ठोले, राजाभाउफ पहाडे, सचिन कासलीवाल ऊदय बाकलीवाल रवी पहाडे पुष्पा पहाडे सूनदा सेठी मानीकचद पाडे अनिल अजमेरा आदी मान्यवरांच्या हस्ते भगवतांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला.

तदनंतर णमोकार भक्तीमंडळाच्या सानिध्यात भगवान शांतीनाथचा पंचामुत अभिषेक करण्यात आला. तसेच णमोकार भक्ति मंडळाचा आज२४वा वर्धापन दिन उत्साहात साजरी करण्यात आला यावेळी यतीन ठोले राजकूमार पाडे विशाल ठोले शैलेश पहाडे वैशाली पहाडे काताबाई पहाडे मयूर ठोले शुभम पाडे सदिप बडजाते शांतीविधानाचे आयोजन दुपारी विविध महिला मंडळाकडुन करण्यात आले होते. या विधानामध्ये सौधर्म इंद्र इंद्राणी राजाभाउफ पहाडे हे होते. तर यावेळी कांताबाई पहाडे यांनी शांती विधानाचे वाचन केले. महिलांनी केशरी व पिवळी साडी, चुदडीच्या साडया परिधान केल्या होत्या. तसेच पुरफ्षांनी पांढरे वस्त्र परिधान केले होते. सायंकाळी भगवंताची महाआरती करण्यात आली. तसेच वर्धापन दिवसा निमीत्त प्रसादी वाटप धरमचंद,, धिरज,चेतन चिराग,मयुर पाटणी,परिवार आडगांववाला लोणवाडीवाला, बालाजीनगर व मोहीत राजाभाऊ पहाडे यांच्या वतीने देण्यात आला.यावेळ विश्वस्थ व समाजबांधवांची उपस्थिती होती.अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली. वर्धापन दिवसाचे औचित्य साधुन अरिहंतनगर, बालाजीनगर, चितामणी कॉलनी, सिडको, हडको, चाणक्यपुरी आदी ठिकाणाहुन हजारो भक्तांनी भगवंताचे दर्शन घेतले.

# संत रविदास महाराजांच्या जयंतीत समाज बांधवांनी सहकुटुंब उपस्थिती राहावे- केंद्रीय जयंती उत्सव समिती अध्यक्ष बालाजी सोनटक्के

**दिनेश देविदास परदेशी (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

११ फेब्रुवारी मंगळवारी काढण्यात आलेल्या दुचाकी वाहन रॅलीच्या समारोप प्रसंगी संत रविदासजी महाराज मंदिर एन-२ सिडको येथील मंदिरात आरती करण्यात आले. तसेच प्रसादाचे वाटप ही करण्यात आले या प्रसंगी केंद्रीय जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी सोनटक्के साहेबांनी बोलताना सांगितले की, १२ फेब्रुवारी रोजी आपण संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करत असताना कुठेही गालबोट लागणार नाही अशी साजरी करायची आहे. उत्साहात आणि आनंदात आपण कोणाच्याही भावना दुखावणार नाही असेच कृत्य आपणास करायचे आहे.




जयंतीत सहभागी होताना समाज ब ांधवांनी आपल्यासह आपल्या कुटुंबातील सदस्यांचा सहभाग आवर्जुन करावा. ७ ते ८ रथ आपल्या जयंती मिरवणुकीत राहतील.क्रांतीचौक या ठिकाणी एक मोठे व्यासपीठ तयार करण्यात आले आहे.

१२/०२/२०२५ रोजी एन-९ टि.व्ही. सेंटर येथील रविदास मंदिरात ध्वजारोहन व पुजन होणार आहे. शहरात, रोहीदासपुरा मुकुंदवाडी रामनगर, जवाहर कॉलनी, सातारा परिसर, सातारा गाव, बन्सीलाल नगर, पदमपुरा, बजाजनगर येथील संत रविदास मंदिराम ध्ये आरती व भंडाऱ्याचे विविध कार्यक्रम स्पर्धा, रक्तदान शिबीर यांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सायंकाळी ५ ते १० वेळेत क्रांती चौकातून संत रविदास महाराजाचे प्रतिमेची भव्य शोभ यात्रा / मिरवणुक काढण्यात येणार आहे. सदर मिरवणूकेचे उदघाटन पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते होणार आहे. सदर मि रवणूकीत शहरातील विविध वार्डातून रथ व वाहने सहभागी होणार आहे. मिरवणुकीचे सांगता औरंगपुरा येथील महात्मा ज्योतीबा फुले पुतळा येथे होणार आहे. तरी सदर जयंती उत्सव आनंदात व उत्साहात साजरा करण्यासाठी व रविदास महाराजाचे विचार सम ाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोहचण्याच्या दृष्टीणे कार्य करण्याचे समितीने सांगितले.

### आज उपवास करायचा आहे- बालाजी सोनटक्के

जगद्गुरू संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करीत असताना आपण आजच्या दिवशी पुरूष मंडळींनी उपवास करायचा आहे. परंतु या उपवासात आपणास खाण्यास मनाई नाही. फक्त मद्य पिवू नये. असा उपवास आपण करायचा आहे. यासह इतरही आवश्यक सूचना केंद्रीय जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी सोनटक्के यांनी केल्या.

## दुचाकी वाहन रॅलीस प्रचंड प्रतिसाद





**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही माघ पौर्णिमेनिमित्त चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत रविदास म हाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्याचा मानस केंद्रीय जयंती उत्सव समितीचा आहे. त्याच अनुषंगाने ११ फेब्रुवारी दुचाकी वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रामनगर येथील संत रविदास महाराजांच्या मंदिरापासून वाहन रॅलीस प्रारंभ झाला. वाहन रॅलीचा शुभारंभ शिवसेना नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते करण्यात आला.



याप्रसंगी सम ाजबांधवांची तसेच संत रविदास महाराजांना मानणाऱ्या इतर समाज बांधवांचीही उपस्थिती होती. वाहन रॅलीला दुपारी १२.३० वाजता रथ समोर चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला. यापूर्वी चंद्रकांत खैरे यांनी संत रविदास महाराजांचे दर्शन घेतले. तसेच प्रार्थनाही केली.

वाहन रॅलीस रामनगरातून प्रारंभ झाला. तेथून मुकुंदवाडी, संत रविदास म हाराज चौक एपीआय कॉर्नर, सिडको, औरंगपुरा महात्मा ज्योती फुले चौक, शाहू महाराज चौक, मिलकॉर्नर, भडकल गेट, अण्णा भाऊसाठे चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजी महाराज चौक, टी.व्ही. सेंटर मार्गे संत रविदास मंदिर एन-२ सिडको येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

याप्रसंगी मंदिरात समितीचे केंद्रीय जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी सोनटक्के यांच्या हस्ते संत रविदास महाराजांची आरती करण्यात आली.

तसेच याप्रसंगी, सचिन वाघ, वल्लभ भंडारी, सुरेश गवळी, भास्कर लहाने, अर्वी. चंद्रकांत गोरे, प्रवीण बोर्डे, संजय चिकसे, मदन भगुरे, दिलीप उंबरे , भारत परमेश्वरी , राजू डोंगरे, रमेश सूरभैय्या गायक हरिदास पुसे, रघुनाथ पदम ,माजी जीएसटी अधीक्षक रामेकर साहेब, विनोद पूरभे विकी फुलमाळी, आधी रविदासिया प्रेमी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकसहभागातून जैन साधू-संतांसाठी रउभारणार त्यागी भवन

## संभवनाथ दिगंबर मंदिर वर्धापनदिनी संकल्प

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जैन समाजात तीर्थकरांच्या भक्तीसोबतच साधूसंतांच्या सेवेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळेच मंदिराइतकेच महत्त्व संतांसाठी त्यागी भवनला आहे. बजाजनगरातील संभवनाथ मंदिरात त्यागी भवन निर्माण केले जात आहे.

संभवनाथ दिगंबर जैन मंदिराचा १३वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. या वेळी लोकसहभागातून त्यागी भवन उभारणीचा संकल्प करण्यात आला. यानिमित्ताने धर्म ध्वजारोहण मिरवणूक काढण्यात आली होती. संभवनाथ भगवंतांची मूर्ती पालखीत ठेवण्यात आली होती.

गावाच्या राशीवरून ठरते तीर्थंकरांची स्थापना - येथे तिसरे तीर्थकर भगवान संभवनाथ यांची स्थापना केली आहे. प्रत्येक मंदिरात कोणत्या तीर्थकरांची स्थापना होईल हे त्या गावाच्या राशीवरून ठरते. सुवीरसागर महाराजांनी ही स्थापना केली आहे, असे सचिव सुजित गोधा यांनी सांगितले.

मूर्ती विराजमान करण्याचे मान अनिता महावीर कासलीवाल, इंद्र इंद्राणी व शांति मंत्र श्रीमती संगीता, स्विटी



कार्तिक गंगवाल. जल अभिषेक व दूध अभिषेक सो कल्पना डॉ दिलीप कुमार जी अक्षय चुडिवाल सर्व औषधी डॉ विशाल अजित काला अर्चना फल सुशीला अभय कुमारजी पापडीवाल मंगल आरती जीवन गंगवाल यान मिळाला यावेळी तुषार,विजय,सौ. कनकमाला,सौ.समता, यशस्वी,अधिराज साहुजी परिवार जामखेडकर व समस्त दिगंबर जैन समाज बजाजनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आला.

श्री विद्यासागर महाराज जी आरती व अघ चढायचे मान सम्यक गार्डन महिला मंडळ यांना मिळाला कायकम यशस्वी करयासाठी अध्यक्ष डॉ राजेंद काला, सचिव सुजित गोधा, उपाध्यक्ष अतुल चुडीवाल, कोषाध्यक्ष सुदेश अजमेरा, सदस्य दिपक काला, महावीर पाडे, सचिन पाटणी, योगेश कासलीवाल, सुनिल पांडे, जीवन गंगवाल खुशाल पाटनी नितीन शहा कैलास , यांच्यासह सल्लागार डॉ.सुरेश बडजाते,रविंद्र ठोले व सकल जैन समाज बजाजनगर, पंढरपुर, वाळुज, सिडको महानगर १ यांची केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली

## पीएनबी घोटाळ्यातील आरोपी मेहुल चोक्सीला कॅन्सर झाल्याची शक्यता

**नवी दिल्ली**- देशातील पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणात फरार असलेला आरोपी मेहुल चोक्सी याला कर्करोग अर्थात कॅन्सर झाल्याची शक्यता आहे. त्याच्या वकिलांनीच तशी माहिती मुंबई येथील विशेष न्यायालयात दिली आहे. मेहुल चोक्सीवर उपचार सुरु आहेत त्याच्या काही चाचण्याही करण्यात येत आहेत असं वकील विजय अग्रवाल यांनी विशेष न्यायालयाला सांगितलं.

मेहुल चोक्सीच्या वकिलांनी काय सांगितलं?

मेहुल चोक्सीचे वकील ॲडव्होकेट विजय अग्रवाल यांनी विशेष न्यायालयाचे न्यायाधीश एस. एम. मनोज जोज यांना सांगितलं की मेहुल चोक्सीला कर्करोग झाल्याची शक्यता आहे. त्यासंदर्भात त्याच्या काही चाचण्या सुरु आहेत. नीरव मोदी आणि त्याचा काका मेहुल चोक्सी या दोघांनी मिळून पीएनबी बँकेत घोटाळा केला. हा घोटाळा १२ हजार कोटींहून अधिक आहे.


# बारावीची परीक्षा सुरळीत सुरु प्रशासन हायलाईट मोडवर

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद शहरातील घृष्णेश्वर महाविद्यालय येथे ४७५ विद्यार्थी व मौलाना आझाद महाविद्यालय येथे १९० विद्यार्थी. कमला नेहरू विद्यालय २२० विद्यार्थी बारावीच्या पहिले ही दिवशी परीक्षेत उपस्थित होते आज मंगळवार पासून बारावी बोर्ड परीक्षेला सुरुवात झाली. परीक्षा केंद्रावर येताना विद्यार्थी थोडे टेन्शनमध्ये दिसत होते. परंतु पेपर झाल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

मंगळवारी सकाळी अकरा वाजता पेपरला सुरुवात झाली. त्याआधी परीक्षा केंद्रावर शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांची झाडाझडती करुनच त्यांना केंद्राच्या आत प्रवेश दिला जात होता. एकूणच काय तर यंदा माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणारी बारावी बोर्ड परीक्षा खूपच कडक नियम व शंभर टक्के कॉपीमुक्त व्हावी यासाठी अभियान राबवलं जात आहे. त्याचीच ही चित्रमय झलक. खुलताबाद शहरासह तालुक्यात १२ वी साठी १२ केंद्रांवर ४६२५ विद्यार्थी परीक्षेला. म ाध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेला सुरुवात झाली असून खुलताबाद तालुक्यात एकूण १२ परीक्षा केंद्रांवर ४६२५ विद्यार्थी परीक्षा देत आहे.या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी परीक्षा कॉपीमुक्त आणि तणावरहीत पार पडावी यासाठी विशेष नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत.

परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी संवेदनशील केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, भरारी पथक, तसेच नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांवर कोणत्याही प्रकारची कॉपीची प्रकरणे घडू नयेत,यासाठी झेरॉक्स केंद्रे बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, पालकांची अनावश्यक गर्दी आणि पुस्तकांची विक्री रोखण्यावरही भर दिला जाणार आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कॉपीमुक्त आणि तणावरहीत परीक्षा पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले आहे.



हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816